IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# लोकशाहीची संकल्पना व अकोले तालुक्यातील आदिवासी राजकीय नेतृत्व

[1] श्री. अनिल निवृत्ती डगळे, [2] डॉ. वहिदा अब्दुल रज्जाक शेख
पीएच. डी संशोधक विद्यार्थी
पीएच. डी संशोधक मार्गदर्शक
MCE Society Abeda Inamdar Senior College of Arts, Science and Commerce, Pune

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***
लोकशाही
राजकीय नेतृत्व
सहभाग

**ABSTRACT**

लोकशाही हा आधुनिक युगातील सर्वाधिक मान्यता प्राप्त शासनप्रकार मानला जातो. लोकशाहीची परिणामकारकता ही मोठ्या प्रमाणात राजकीय नेतृत्वावर अवलंबून असते. भारतीय लोकशाहीची मुळे स्वातंत्र्यलढ्यात रुजली असून संविधान निर्मात्यांनी लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांना शासनाच्या केंद्रस्थानी ठेवले. या लेखामध्ये लोकशाहीची संकल्पना, तिचा विकास, नेतृत्वाची व्याख्या व सैद्धांतिक पार्श्वभूमी तसेच भारतीय लोकशाहीतील नेतृत्वाचे प्रकार यांचे विश्लेषण केले आहे. त्याचबरोबर अकोले तालुक्यातील स्थानिक नेतृत्वाची भूमिका, विशेषतः ग्रामीण व आदिवासी भागातील लोकसहभाग, नेतृत्वाची कार्यसंस्कृती आणि लोकशाहीच्या व्यवहारातील अडचणी स्पष्ट केल्या आहेत. ७३ व्या घटनादुरुस्तीचा प्रभाव, विकेंद्रीकरण, सहभागाची लवचिकता आणि भविष्यकालीन नेतृत्वाची आवश्यकता यावरही चर्चा करण्यात आली आहे.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 2%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Dagale, A. N., & Sheikh, W. A. R. (2025). लोकशाहीची संकल्पना व अकोले तालुक्यातील आदिवासी राजकीय नेतृत्व. IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS), 1(IV), 189–196.

## 1. प्रस्तावना

लोकशाही हा आधुनिक युगातील सर्वाधिक मान्यता प्राप्त शासनप्रकार आहे. लोकशाही म्हणजे केवळ निवडणुका, सरकार वा राजकीय सत्ता नव्हे, तर ती जीवन जगण्याची एक पद्धत, संस्कृती आणि मूल्याधिष्ठित दृष्टिकोन आहे. लोकशाहीचे यश किंवा अपयश हे समाजातील राजकीय नेतृत्वावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असते. अब्राहम लिंकन यांनी दिलेली व्याख्या – "लोकांचेच, लोकांनी केलेले, आणि लोकांसाठी असलेले राज्य" – ही लोकशाहीची मर्मभूमी आहे.[१] भारतीय लोकशाही ही जगातील सर्वात मोठी लोकशाही आहे. येथे सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विविधतेच्या पार्श्वभूमीवर लोकशाही टिकून राहिली आहे, हे भारतीय नेतृत्वाचे मोठे यश आहे. मात्र या लोकशाहीला सशक्त ठेवण्यासाठी सुसंस्कृत, नैतिक आणि जबाबदार नेतृत्वाची गरज आज अधिक भासते. म्हणूनच या पेपरचा उद्देश "राजकीय नेतृत्व आणि लोकशाही" या परस्परसंबंधाचा सखोल अभ्यास करणे आहे.

## 1. उद्दिष्ट

1. लोकशाही आणि राजकीय नेतृत्व यांच्यातील परस्परसंबंधाचे सैद्धांतिक, ऐतिहासिक आणि भारतीय संदर्भातील विश्लेषण करणे.
2. लोकशाहीची संकल्पना, मूलतत्त्वे आणि तिचा जागतिक व भारतीय विकासक्रम यांचा अभ्यास करणे.
3. भारतीय लोकशाहीच्या उभारणीत आणि स्थिरतेत विविध स्तरांवरील राजकीय नेतृत्वाची भूमिका विश्लेषित करणे.
4. स्थानिक स्वराज्य संस्थांतील नेतृत्वाचा लोकसहभाग, सामाजिक न्याय आणि विकास प्रक्रियेवर होणारा परिणाम अभ्यासणे.
5. अकोले तालुक्यातील स्थानिक राजकीय नेतृत्वाचा लोकशाही सुदृढीकरणावर झालेला प्रभाव तपासणे.

## २. लोकशाहीची संकल्पना आणि विकास

'लोकशाही' (Democracy) हा शब्द ग्रीक शब्द Demos (लोक) आणि Kratos (सत्ता) यांपासून बनलेला आहे. म्हणजेच "जनतेची सत्ता".[२] प्राचीन ग्रीसमध्ये नागरिक सभांद्वारे थेट निर्णय घेत होते. या पद्धतीला साक्षात लोकशाही म्हणतात. आधुनिक काळात जनसंख्या वाढल्यामुळे प्रतिनिधिक लोकशाही अस्तित्वात आली.

लोकशाहीचा विकास पुढील टप्प्यांतून झाला —

१. प्राचीन काळ: ग्रीक नगरराज्यांतील थेट लोकशाही.

२. मध्ययुगीन काळ: राजेशाहीचा प्रभाव, पण नगरस्वराज्यांची बीजे.

३. आधुनिक काळ: इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका यांतील लोकशाही क्रांती.

४. स्वातंत्र्योत्तर काळ: उपनिवेशांपासून मुक्त झालेल्या देशांनी लोकशाही स्वीकारली.

५. लोकशाहीच्या तत्त्वांमध्ये समानता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय आणि लोकसहभाग हे प्रमुख घटक मानले जातात.[३]

## ३. भारतीय लोकशाहीचा उदय आणि नेतृत्वाची भूमिका

भारतीय लोकशाहीचा पाया स्वातंत्र्यलढ्याच्या काळात घातला गेला. महात्मा गांधी, पंडित नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजेंद्रप्रसाद इत्यादींनी लोकशाही मूल्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी

केली. भारतीय राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला प्रौढ मताधिकार, समानता, आणि स्वातंत्र्य यांचे हक्क दिले. या हक्कांच्या माध्यमातून नागरिक शासनात सहभागी होतात. संविधान सभेतील नेत्यांनी लोकशाहीचा आत्मा संविधानात प्रतिबिंबित केला.[४] डॉ. आंबेडकर यांच्या मते, "राजकीय लोकशाहीला सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीची जोड मिळाली पाहिजे." म्हणजेच नेतृत्व केवळ सत्तेसाठी नव्हे तर सामाजिक न्यायासाठी कार्यरत असावे. भारतीय लोकशाही आज 75 वर्षांहून अधिक काळ टिकून आहे, कारण येथे लोकसहभाग आणि नेतृत्वाचा सतत संवाद टिकून आहे.

### ४. राजकीय नेतृत्वाची व्याख्या, स्वरूप व सैद्धांतिक पार्श्वभूमी

राजकीय नेतृत्व म्हणजे "एखाद्या गटाचे ध्येय साध्य करण्यासाठी प्रेरणा, मार्गदर्शन आणि संघटन करणारी प्रक्रिया" (राज्यशास्त्र कोष). बर्न्स (1978) यांच्या मते, "Leadership is an aspect of power but also a separate and vital process in itself." म्हणजेच नेतृत्व हे सत्तेचा एक भाग असले तरी ते स्वतंत्र आणि जीवनावश्यक प्रक्रिया आहे.[५]

प्रमुख सिद्धांतकारांच्या दृष्टीने —

1. **मॅक्स वेबर:** नेतृत्व हे करिश्माई, पारंपरिक आणि कायदेशीर या तीन प्रकारचे असते.
2. **लासवेल:** "राजकारण म्हणजे सत्तेसाठी संघर्ष" — या संघर्षात नेतृत्वाची भूमिका निर्णायक असते.
3. **राल्फ नादर:** "नेता म्हणजे अनुयायी नव्हे, तर पुढील नेते घडवणारा व्यक्ती."
4. **महात्मा गांधी:** "नेतृत्व म्हणजे सेवा."

नेतृत्वाचे स्वरूप केवळ राजकीय सत्तेपुरते मर्यादित नसून सामाजिक आणि नैतिक जबाबदारीशी निगडीत आहे.

### ५. नेतृत्व आणि लोकशाहीतील परस्परसंबंध

लोकशाही नेतृत्वाला जन्म देते, आणि नेतृत्व लोकशाहीला जीवन देते. हे नाते परस्परावलंबी आहे. लोकशाहीत लोकांचा विश्वास मिळवणे हे नेतृत्वाचे प्रमुख कर्तव्य आहे. निवडणूक प्रक्रिया, नीतिनिर्मिती, विकास योजना या सर्व प्रक्रियांना नेतृत्व दिशा देते. नेतृत्वाच्या वर्तनावरून लोकशाहीचे आरोग्य ठरते. उदाहरणार्थ, नेहरूंचे दृष्टीकोनाधारित नेतृत्व, आंबेडकरांचे न्यायनिष्ठ नेतृत्व, वाजपेयींचे संवादशील नेतृत्व हे भारतीय लोकशाहीचे बळ ठरले.[६]

### ६. स्थानिक पातळीवरील नेतृत्व

अकोले तालुका (जि. अहिल्यानगर) हा प्रामुख्याने आदिवासी आणि ग्रामीण भाग आहे. या भागात लोकशाहीचा पाया स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था, आणि राजकीय नेतृत्वाच्या कार्यातून मजबूत झाला आहे. मधुकर पिचड आणि नंतर वैभव पिचड व डॉ. किरण लहामटे यांचे नेतृत्व या भागातील विकास योजनांमध्ये दिसून येते. जलसंधारण, शिक्षण, आणि आदिवासी सक्षमीकरण यासाठी त्यांनी कार्य केले. अकोले तालुक्यातील नेतृत्वाने लोकशाहीचे कार्यस्थानिक पातळीवर नेऊन सामाजिक न्याय आणि विकासाचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. या माध्यमातून लोकशाहीची प्रत्यक्ष अनुभूती सामान्य नागरिकाला मिळाली.

अहमदनगर जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघातील राजकिय नेतृत्वाचे महाराष्ट्राच्या राजकारणात प्रभाव दिसून येतो. यामध्ये अकोले तालुक्यातील राजकीय नेतृत्वाचा देखील महाराष्ट्राच्या राजकारणातील भूमिका महत्त्वाची आहे. अकोले तालुक्यातील राजकीय नेतृत्वामध्ये १९५२ मध्ये गोपाळा श्रावणा भांगरे, १९५७ मध्ये नारायण

नवाळी, १९६२ मध्ये यशवंतराव भांगरे, १९६७ मध्ये बी.के.देशमुख, १९७२ मध्ये यशवंतराव भांगरे, १९८० ते २०१४ पर्यंत मधुकरराव पिचड, २०१४ ते २०१९ मध्ये वैभवराव पिचड व २०१९ ते २०२४ पर्यंत डॉ.किरण लहामटे हे अकोले तालुक्याचे आमदार आहे.[७] मधुकरराव पिचड यांनी भूषवलेली मंत्रीपदे व कार्य यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात प्रभावी भूमिका राहिलेली आहे. अकोले तालुक्यातील नेतृत्वात मधुकरराव पिचड यांची महाराष्ट्राच्या राजकारणात सर्वात जास्त वर्चस्व लाभले आहे.

**७. अकोले तालुक्यातील प्रमुख आदिवासी राजकीय नेते**

**१. गोपाळराव श्रावणा भांगरे (अकोले विधानसभा पहिले आमदार १९५२-१९५७)**

**सामाजिक व राजकीय कारकीर्द-**

आदिवासी समाज मोठ्या प्रमाणावर असल्याने अकोले विधानसभा मतदारसंघ एसटी बांधवांसाठी कायमचा राखीव झाला. सन १९५२ साली विधानसभा लागल्यानंतर येथे कोण असा व्यक्ती आहे. तो सामाजाप्रती आत्मियता राखतो, जनतेचे दुःख जातो, जो सर्व धर्म समभाव माणून बहुजणांना देखील न्याय देऊ शकतो. इतकेच काय ! सुशिक्षित आणि उमदा तरुण कोण? असा शोध सुरू झाला आणि पहिले नाव पुढे आले ते म्हणजे गोपाळ श्रावणा भांगरे (रा. शेंडी, ता. अकोले) पेशाने शिक्षक असणारा हा व्यक्ती नोकरीबरोबर समाजाप्रती काहीतरी करण्याची जिद्द ठेऊन निःस्वार्थी भावनेने तालुकाभर काम करत होता.[८] हीच वृत्ती काँग्रेसच्या नेत्यांना भावली आणि भांगरे कुटुंबाला विधानभवनात जाण्याचा पहिला बहुमान मिळाला. गोपाळ श्रावणा भांगरे हे जानेवारी १९५२ मध्ये पहिल्यांदा आमदार झाले.

एक शिक्षकातील सज्जन व शिस्तप्रिय व्यक्तीमत्व भंडारदऱ्याच्या कुशीतून थेट मुंबईत गेले. तेव्हा वाहने, फारशा बसेस व मोबाईल यांच्यासह विज्ञानाची देखील इतकी प्रगती झालेली नव्हती. तरी देखील मिळेल त्या साधनाने गोपाळ भांगरे हे अकोले तालुक्याचे नाना प्रश्न विधानसभेत मांडत होते. दळणवळणाच्या सेवा सुविधा अगदी अत्याल्प असल्यामुळे तालुक्याचा विकास करताना त्यांना अनेक अडचणी येत होत्या. मात्र, माझा तालुका सुज्ञ झाला पाहिजे, येथे प्रत्येकाला शिक्षण, आरोग्य व किमान मुलभुत गरजा तरी मिळाल्या पाहिजेत यासाठी भांगरे यांनी अगदी नेटाने प्रयत्न केला. खरंतर, तेव्हा इतिहास लिहीण्यासाठी प्रगल्भ ठरेल अशी लोकशीही असली तरी, फारसे लोक शिकलेले नव्हते, माध्यमांची प्रगती नव्हती त्यामुळे गोपाळ भांगरे यांचा फारसा इतिहास लिहीला गेला नाही. मात्र, त्यांची समाजाप्रती तळमळ ही भांगरे कुटुंबात आजही त्यांच्या निम्मिताने सर्वार्थाने पहावयास मिळते.

भांगरे यांनी लोकशाहीच्या अधिकारांवर १९५२ ते १९५७ चा कार्यकाळ अगदी यशस्वीपणे पुर्ण केला. त्यानंतर १९५७ साली पुन्हा विधानसभा लागल्यानंतर त्यांना जनतेचा मोठा कौल मिळत होता. मात्र, दुर्दैवाने भांगरे कुटुंबावर फार मोठे संकट ओढवले आणि गोपाळराव भांगरे हे अकोले तालुक्यातील समशेरपूर येथे विधानसभेचा प्रचार करीत असताना त्यांना भर सभेत स्टेजवर भुरळ आली आणि त्यांचा दुर्दैवी अंत झाला.

**२. नारायण नवाळी (अकोले विधानसभा सदस्य १९५७-१९६२)**

**सामाजिक व राजकीय कारकीर्द-**

सन १९५७-५८ मध्ये राज्यात संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे वारे वाहु लागले होते. तेव्हापासून राज्यात कम्युनिस्टांची चलती सुरू झाली होती. यांच्याकडून जो कोणी उमेदवार उभा केला जात होता. त्याला संयुक्त महाराष्ट्र समिती असे संबोधुन एक प्रकारे चळवळीला बळकटी दिली जात होती. या समितीकडून नारायण नवाळी या अभ्यासू

व्यक्तीमत्वास संधी मिळाली होती. त्यांनी देखील स्वत:ला सार्थ ठरवून अनेकांचा पराभव करुन विजय मिळविला. त्यांच्याच कार्यकाळात १ मे १९६० साली संयुक्त महाराष्ट्राची स्थापना करण्यात आली होती. १९५७ मध्ये झालेल्या दुसऱ्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी अकोले मतदारसंघातून काँग्रेस पक्षाच्या उमेदवारीवर निवडणूक लढवली. त्यांनी मोठ्या मताधिक्याने विजय मिळवून अकोलेचे दुसरे आमदार म्हणून कार्यभार स्वीकारला.

१९५७ ते १९६२ या कार्यकाळात त्यांनी अकोले तालुक्यातील ग्रामीण आणि आदिवासी भागात शैक्षणिक सुविधा पोचवण्यासाठी प्राथमिक शाळा, वसतिगृह आणि शिक्षण मंडळांशी समन्वय साधून काम केले. मुलींच्या शिक्षणासाठी स्वतंत्र शाळा आणि विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळवून देण्यासाठी त्यांनी पाठपुरावा केला. ते ग्रामस्वराज्य, लोकशाही व सर्वसमावेशक नेतृत्वावर विश्वास ठेवणारे नेते होते. त्यांनी आपल्या मतदारसंघात गावपातळीवर समस्या ऐकून त्यावर तात्काळ उपाय सुचवले. स्थानिक स्वराज्य संस्थांना बळकटी देण्यासाठी त्यांनी सहकारी संस्था आणि ग्रामसभा सशक्त करण्याचा प्रयत्न केला. कृषी विकासासाठी त्यांनी सिंचन योजना, बंधारे, विहिरी आणि खत-वितरण केंद्र सुरू करण्यासाठी पंचायत समितीमार्फत योजनांचा पाठपुरावा केला. शेतकऱ्यांच्या पाण्याच्या गरजा, वीजेची मागणी, आणि कृषी सेवा केंद्रांची गरज याविषयी त्यांनी विधानसभेत वेळोवेळी मांडणी केली. [९]

**३. यशवंतराव सखाराम भांगरे (अकोले विधानसभा सदस्य,१९६२-१९६७,१९७२-१९७७,१९७७-१९८०)**

जन्म- ९ ऑक्टोबर १९३५ शेंडी (भंडारदरा), तालुका-अकोले, जिल्हा-अहमदनगर

**सामाजिक व राजकीय कारकीर्द-**

यशवंतराव भांगरे हे १९६२ मध्ये विधानसभेत निवडणून गेले तेव्हा त्यांची यशवंतराव चव्हाण यांनी पाठ थोपटली होती. सन १९६५ साली आदिवासी समाजासाठी आदिवासी उन्नती सेवा मंडळाची स्थापना करुन एक मोठे योगदान समाजासाठी देऊ केले होते. तसेच डांगी गोसेवा मंडळाची देखील त्यांनी स्थापना करुन येथील जनतेला प्रेरणा मिळावी म्हणून मोठे प्रदर्शन देखील सुरू करण्याचा बहुमान भांगरे यांनी घेतला होता. विशेष म्हणजे समाजासाठी जे काही करता येईल ते अगदी निःस्वार्थपणे करण्याची वृत्ती त्यांच्या अंगी होती. त्यामुळे त्यांना माननारा वर्ग देखील फार मोठा निर्माण झाला होता. त्याकाळी संपूर्ण तालुक्यात एकही महाविद्यालय नव्हते. मुलांना पुढील शिक्षण घेण्यासाठी थेट संगमनेर, श्रीरामपूर, अहमदनगर येथे जावे लागे. बरीच हुशार मुले आर्थिक अडचणींमुळे मध्येच शिक्षण सोडून घरीच थांबायची. ह्या गोष्टीचे शल्य सर्वांत जास्त भांगरे साहेबांना बोचायचे. कसे करता येईल ह्या विचारात असतानाच काही कार्यकर्त्यांच्या मदतीने यशवंतराव भांगरे साहेबानी तालुक्याच्या ठिकाणी जागा मिळत नसतानाही श्री. भालेराव ह्यांची जागा घेऊन अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली आणि त्यांचा जीव भांड्यात पडला. त्यांनी अतिशय चपळतेने संस्थापक, विश्वस्त कालकथित दादासाहेब रूपवते, कॉ.बुवासाहेब नवले, श्री.लालचंद शहा, बा.ह.नाईकवाडी, ॲड.सुगंधराव देशमुख व कार्यकर्त्यांच्या मदतीने अतिशय चोख कार्यभार चालविला. त्यांनी संस्थेची अनेक विद्यालये उभी करण्यास हातभार लावला.[१०]

सुरूवातीला आदिवासींची जमात पंचायत कार्यरत होती. मात्र शहरवासीयांच्या जवळ आल्याने आदिवासींची जमात पंचायत संपुष्टात आली होती. काही भांडण-बखेडे झाले, अन्याय झाला की, आदिवासींना न्याय मागण्यासाठी संगमनेर अथवा श्रीरामपूर आणि अहमदनगर येथे जावे लागत होते. यशवंतराव भांगरे ह्यांनी अनेक

वर्ष खटपट करून एकदाची अकोल्यात तालुक्याच्या ठिकाणी १९६५ साली न्यायालय आणले व कामकाजही सुरू केले होते. १९७२ च्या दुष्काळात थेट पंतप्रधान इंदिरा गांधी ह्यांच्याशी भेट घेऊन विशेष निधी मंजूर करून घेऊन आपल्या भागात अनेक ठिकाणी एकाचवेळी दुष्काळी कामे सुरू केली होती. त्यातून तालुक्यात गावोगावी छोटे-मोठे रस्ते झाले. अकोले तालुक्यातील राजूर, डांगाण, मुळनाई हा भाग म्हणजे दुष्काळी भाग होता. पाण्याची मोठी चिंता असायची. पावसाळ्यात भरपूर पाऊस मात्र उन्हाळ्यात जानेवारीमध्ये पाण्याची अडचण येत होती. साहेबांनी गावोगावच्या लोकांना विश्वासत घेऊन सामूहिक गावकीसाठी शासनाच्या निधीतून विहिरीची कामे करून घेतली होती. पिण्याच्या पाण्याबरोबर थोड्या बहुत शेतीच्या पाण्याचीही चिंता मिटायला हवी म्हणून त्यांनी बऱ्याच ठिकाणी पाझर तलाव, गावतळी बांधण्याचा प्रयत्न केला होता. १९७२ ते १९७७ सालापर्यंत भांगरे यांनी तालुक्याला फार मोठे योगदान दिले आहे. पुढे १९७८ साली पुन्हा निवडणुका लागल्या आणि तेव्हा खऱ्या अर्थाने माजी मंत्री मधुकर पिचड यांची राज्याच्या राजकारणात प्रवेश झाला. १९७७ साली मधुकर पिचड साहेब यांचा भांगरे यांनी दारुन पराभव केला. मात्र, त्यावेळी ७ मार्च १९७८ साली मुख्यमंत्री वसंतदादा पाटील व उपमुख्यमंत्री नाशिकराव तिरपुडे यांच्यात सरकार स्थापन झाले आणि फुटलेल्या काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र आले. त्यात इंदीरा काँग्रेस व रेड्डी काँग्रेस यांनी सत्ता स्थापन केली. पुढे १ जानेवारी १९८२ साली सह्याद्रीचा पुत्र यशवंतराव भांगरे साहेब अनंतात विलीन झाले.

### 1. कॉ. बी. के. ऊर्फ बापूराव कृष्णाजी देशमुख – ( अकोले विधानसभा सदस्य १९६७-१९७२)

**परिचय –**

कॉ. बी. के. देशमुख यांचा जन्म दि. ४ मार्च १९२१ केळंगण तालुका अकोले, जि. अहमदनगर येथे आदिवासी महादेव कोळी जमातीत झाला. वडील कृष्णाजी दगडू देशमुख यांचे ते सर्वांत लहान चिरंजीव म्हणून त्यांना बारकू म्हणूनच सर्वजण ओळखतात. कॉ. बी. के. देशमुख यांचे बालपण गरिबीत गेले. लहानपणी हूड स्वभावाच्या बी. के. नी. कामाबरोबरच रानावनांत जनावरे चारली. ही कामे करत असतानाच त्यांनी शालेय शिक्षण चालू ठेवले. इंग्रजी शिक्षणासाठी संगमनेर येथील पेटीट हायस्कूलमध्ये इंग्रजी पहिलीसाठी प्रवेश घेतला. घरच्या गरिबीमुळे इंग्रजी शिक्षणाचा खर्च भागविणे कठीण होते तरी देखील त्यांच्या मातोश्रींनी आपले दागिने मोडून शिक्षणाचा खर्च केला. परंतु बी. के. ला हे समजल्यावर त्यांनी इंग्रजी शिक्षणास रामराम ठोकला. सुरुवातीला काही काळ त्यांनी प्राथमिक शिक्षकाची नोकरी केली. शिक्षक म्हणून नोकरी करीत असताना त्यांनी समाजाचे जवळून निरीक्षण केले.[११] शेतकी कोर्स चांगल्याप्रकारे पूर्ण करून कॉ. बी. के. देशमुख शेतकी खात्यात रुजू झाले. त्यांची नेमणूक अकोले तालुक्यात झाली.

### 1. समाजकारण आणि राजकारणातील सक्रीय सहभाग :

१९६७ मध्ये झालेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत बापूराव कृष्णाजी देशमुख यांनी अकोले विधानसभा मतदारसंघातून कॉम्रेड पक्षाच्या तिकिटावर निवडणूक लढवून विजय संपादन केला. त्या वेळी कॉंग्रेस पक्षाचे वर्चस्व असताना एक समाजवादी विचारांचे, श्रमिक हिताचे प्रतिनिधित्व करणारे उमेदवार म्हणून त्यांनी विजय मिळवणे हे अत्यंत महत्त्वाचे ठरले. त्यांच्या आमदारकीच्या कार्यकाळात त्यांनी अकोले तालुक्यातील आदिवासी, शेतकरी, दलित आणि श्रमिक वर्गाच्या समस्या विधानसभेत प्रभावीपणे मांडल्या. त्यांनी अकोले तालुक्यातील पायाभूत

सुविधांसाठी प्रयत्न केले. उदाहरणार्थ, रस्ते, सिंचन प्रकल्प, शाळा व आरोग्य केंद्रांच्या उभारणीसाठी त्यांनी अनेक ठिकाणी पाठपुरावा केला.

2. **मधुकरराव काशिनाथ पिचड** –

(अकोले विधानसभा सदस्य व मंत्री - १९८०-१९८५, १९८५-१९९०, १९९०-१९९५, १९९५-१९९९, १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४)

**जीवन परिचय**

१ जून १९४१ अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील राजूर येथे झाला आहे. वडील प्राथमिक शिक्षक होते. मधुकरराव पिचड यांचे प्राथमिक शिक्षण गावी झाले. माध्यमिक शिक्षण संगमनेर येथे झाले असून त्यांनी वस्तीगृहात राहून शिक्षण पूर्ण केले. पदवीचे शिक्षण फर्ग्युसन महाविद्यालय पुणे येथे झाले. पुढे एल.एल.बी.चे दोन वर्षे केले. येथेच राष्ट्र सेवा दलाशी संपर्क आला. महाविद्यालयीन निवडणूकांत सहभागी होत गेले. तेथेच थोर विचारवंत व स्वातंत्र्य सैनिक प्रा. ग. प्र. प्रधानांशी संपर्क आला व त्यांच्या विधानांचा पगडा, सामाजिक, राजकीय क्षेत्रात काम करावे म्हणून प्रोत्साहन मिळाले. त्यांच्याच प्रेरणेने नोकरीच्या फंदात न पडता सार्वजनिक जीवनात प्रवेश, काँग्रेस प्रवेश, महाविद्यालयात असतांनाच, आदिवासी शेतकऱ्यांच्या शोषणाविरुद्ध आंदोलनात सक्रीय सहभाग नोंदविला. आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी, आदिवासी उन्नती सेवा मंडळाची स्थापना केली. याच संस्थेच्या अनेक आश्रमशाळा, माध्यमिक शाळा, वसतीगृहे आहेत. अकोले तालुक्यात कम्युनिस्टांचे वर्चस्व होते. अशा पार्श्वभूमीवर काँग्रेसची पाळमुळे रोवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. काँग्रेस हा व्यापारी धनीकांचा पक्ष आहे ही प्रतिभा नाहीशी केली. व सर्वसामान्य माणसाला काँग्रेसच्या प्रवाहात आणले.[१२]

3. **सामाजिक व राजकीय कारकीर्द-**

**जिल्हा परिषद सदस्य :** १९७२ ला निवडून आले.

**सभापती :** १९७२ ते १९८० पर्यंत अकोले पंचायत समितीचे सभापती. सभापती असतांना १९७२ च्या दुष्काळात अहोरात्र काम केले. मेडिकल कॅम्पचे आयोजन, गाव तेथे रस्ता, तलाव या योजना राबविल्या. झाले.

**विधानसभा सदस्य :** १९८० ला अकोले विधानसभेवर निवडून आले व तालुक्याचे आमदार झाले.

**समितीवर निवड :** १९८० ते १९८५ विधानसभा अनुसूचित जमाती कल्याण समिती प्रमुख म्हणून काम केले.

**राज्यमंत्री :** जून १९८५ ते १९८६ राज्यमंत्री २७ जून १९८८ ते १२ मार्च १९९० कृषी, रोहयो, आदिवासी विकास, दुग्ध विकास, पशुसंवर्धन खात्याचे राज्यमंत्री

**उल्लेखनीय कामगिरी :**

स्वतंत्र अर्थसंकल्प, आदिवासी घुसखोरी विरुद्धचा कायदा, सन २००० ला पेसा कायदा, चकाजाम आंदोलनाचे नेतृत्व, भंडारदरा पाण्याचे फेरवाटप इत्यादी कामे त्यांच्या हातून झाले.

**कॅबिनेट मंत्री :** २८ जून १९९१ ते नोव्हेंबर १९९६ आदिवासी विकास, वन व पर्यावरण मंत्री याच दरम्यान मार्च १९९३ ते सप्टेंबर १९९४ आदिवासी विकास सहपशुसंवर्धन व दुग्ध, मत्स्य विकास मंत्री, सप्टेंबर १९९४ ते नोव्हेंबर १९९४ आदिवासी विकास.[१३]

**राजीनामा :** २४-११-१९९४ रोजी गोवारी हत्याकांडाची नैतिक जबाबदारी स्वीकारून नागपूर अधिवेशनात

मंत्रीपदाचा राजीनामा दिला.

**संस्थापक अध्यक्ष :** १९९३ मध्ये अगस्ति सह. साखर कारखान्याची स्थापना केली.

**विधानसभा विरोधी पक्ष नेते** : २५ मार्च १९९५ ते २५ जुलै १९९९ विधानसभा विरोधी पक्ष नेते म्हणून जबाबदारी यशस्वी पेलली.

**कॅबिनेट मंत्री :** परिवहन व पूनर्वसन विकास मंत्री

**कॅबिनेट मंत्री :** १९ ऑगस्ट १९९९ ते ऑगस्ट २००४ आदिवासी विकास, विशेष सहाय्य मंत्री राष्ट्रीय कार्याध्यक्ष : आखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेवर ७ ऑक्टोबर २००१ रोजी निवड [१४]

**प्रदेशाध्यक्ष :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष म्हणून निवड

**कॅबिनेट मंत्री :** ११ जून २०१३ रोजी आदिवासी विकास मंत्री म्हणून निवड

**मधुकरराव पिचड यांच्या नावे खालील बाबी येतात-**

1. निळवंडे धरणाचे 'जनक'
2. आदिवासी विकास विभागाचा विकास
3. आदिवासी मुलांसाठी वसतिगृह व शिक्षण
4. विशेष बाब म्हणून निळवडे मॉडेल....
5. धरणग्रस्तांचे आदर्श पुनर्वसन
6. अगस्ति सहकारी साखर कारखाण्याला गती
7. अकोले तालुक्यात १७ छोट्या धरणांची निर्मिती.

**संदर्भ सूची**


1. आठवले, स. १९६०, लोकशाहीचा कारभार. पुणे: साधना प्रकाशन.
2. जावडेकर, शं. द.१९४९, लोकशाही. पुणे: श्री मंगेश प्रकाशन.
3. गद्रे, दि. का. १९७६, लोकप्रशासन तत्त्व आणि तंत्र. नागपूर: श्री मंगेश प्रकाशन.
4. भोळे, भा. ल. १९८८, राजकीय विश्लेषण. नागपूर: पिंपळापुरे पब्लिकेशन.
5. पळशीकर, सु. व कुलकर्णी, सु.२००७. महाराष्ट्रातील सत्ता संघर्ष: राजकीय पक्षाची वाटचाल. पुणे: समकालीन प्रकाशन.
6. पाटील, पी. बी. २००२, भारतीय शासन व राजकारण. कोल्हापूर: फडके प्रकाशन.
7. गारे गोविंद, ११९८, आदिवासी विकासातील दीपस्तंभ,पुणे,श्री विद्या प्रकाशन पान. नं. ११५
8. सागर शिंदे, सार्वभौम (अकोले), २९ जानेवारी २०२१
9. Akole Panchayat Samiti Annual Report, १९५९-६०
10. तुकाराम रोंगटे, २०११, आदिवासी आयकॉन्स, पुणे, संस्कृती प्रकाशन. पान नं. १३३
11. तुकाराम रोंगटे, २०११, आदिवासी आयकॉन्स, पुणे, संस्कृती प्रकाशन. पान नं. ४४
12. डॉ. गोविंद गारे, १९९८, आदिवासी विकासातील दीपस्तंभ,पुणे,श्री विद्या प्रकाशन पान. नं. २३५
13. राज्य निवडणूक अहवाल २००४
14. यशवंतराव आभाळे , २००९, ध्यास विकासाचा सर्वांगीण प्रगतीचा, अकोले